# तरूण पिढीही रंगभूमीसाठी झटते आहे!

**भालचंद्र पेंढारकर**

मराठी रंगभूमीच्या पुढील १०० वर्षाबद्दल विचार करताना आधी मागील १०० वर्षांचा विचार मनात येतो. रंगभूमीची सुरूवात विष्णुदास भावे यांच्या सीतास्वयंवर नाटकापासून झाली. ते साल होतं १८४३! ५ नोव्हेंबर १९४३ साली मराठी रंगभूमीचा जो शतसंवत्सरी महोत्सव सांगलीला झाला, त्याप्रसंगी हजर असलेल्यांपैकी आता फक्त मी एकटाच उरलोय.

तो शतसंवत्सरी महोत्सव मुंबईलाही केला पाहिजे असा विचार आम्ही मंडळींनी केला. त्यासाठीचं थिएटर शक्यतो गिरगावात असावं असं ठरलं. एप्रिल १९४४ मध्ये हा नाट्योत्सव करावा असा निर्णय डिसेंबर १९४३ मध्ये घेण्यात आला, पण प्रत्यक्षात रांगणेकर, नंदू खोटे, पार्श्वनाथ आळतेकर, माझी संस्था वगैरे सहा संस्थांनी मिळून हा शतसंवत्सरी नाट्य महोत्सव फेब्रुवारीतच रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये साजरा करण्याचं ठरवलं, केला ही. मग आम्ही विचार केला की, खूप वर्ष असा महोत्सव भरवला तरच थिएटर बांधता येईल, आणि ते काम आम्हाला आमच्या आवाक्याबाहेरचं वाटलं. शेवटी जमवलेला निधी जिथे रंगभूमीबद्दल काही काम होत असेल, तिथे देऊन टाकावा असं ठरवून आम्ही गप्प बसलो.

पण तोपर्यंत संघाच्या मंडळींनी इकडे महोत्सव करण्याचं ठरविलं होतं. १४ एप्रिल ही तारीख ठरली आणि तो महोत्सव दहा दिवसांचा असावा व या महोत्सवाकरिता मरीन लाईन्सच्या जिमखान्याच्या ग्राऊंडवर मोठा मंडप घालावा असं ठरलं. १४ एप्रिलला हा महोत्सव सुरू होणार होता त्याच दिवशी मुंबईत बॉम्बस्फोट झाला. त्यामुळे आमचा त्या दिवशीचा प्रयोग होऊ शकला नाही. दुसऱ्या दिवशी आळतेकरांच्या संस्थेचा प्रयोग होता तो मात्र झाला. या महोत्सवापासून प्रेक्षक संगीत नाटकाकडे वळू लागले. त्या उत्सवाला जवळजवळ ८ ते १० हजार प्रेक्षक जमले होते... असा हा उत्सव १९५० सालापर्यंत दरवर्षी होत होता.

'होनाजी बाळा' १९५४ मध्ये रंगभूमीवर आलं आणि त्याचवेळेस दिल्लीला जो राष्ट्रीय नाट्य उत्सव झाला, त्यामध्ये संघाच्या 'भाऊबंदकी' या नाटकाला पहिलं बक्षिस मिळालं आणि तिथं 'होनाजी बाळा' चा प्रयोग झाला. भरत नाट्य मंदिरने तिथेच (या संस्थेला नुकतीच ११० वर्षे पूर्ण झाली आहेत) 'शारदा' नाटकाचा प्रयोग केला. माझ्या भाग्याची गोष्ट अशी की त्या शारदेच्या प्रयोगामध्ये मी कोदंड होतो आणि प्रभा अत्रे ह्या शारदा होत्या. म्हणजे सांगलीच्या शतसंवत्सरीला झालेल्या 'शारदा' चा मी साक्षीदार होतो तर इथे मी प्रत्यक्ष नाटकात काम करीत होतो. आणि 'होनाजीबाळा' च्या प्रयोगातही होतो.

१९५४ सालापासून नवीन संगीत नाटकाच्या दृष्टीकोनातून विचार सुरू झाले. नवीन संगीत नाटकांना, हौशी नाट्य संस्थांना साहित्य संघाच्या या महोत्सवामुळे प्रेरणा मिळाली. पुढे १०० वर्षे संगीत नाटक जर टिकवायचं असेल तर प्रथम संस्थेचं एकत्रीकरण टिकवलं पाहिजे. संस्था टिकली तरच संगीत नाटके टिकतील. (म्हणूनच पूर्वी नाटक कंपन्या असायच्या) प्रेक्षक तुमचं एकत्रित काम पहायला येतात, सगळ्यांना वाटतं की नटानं शिस्त पाळावी, पण मी म्हणतो की शिस्त ही एकट्या नटानेच नव्हे तर सगळ्यांनीच पाळायला हवी. कुठलीही संस्था शिस्तीशिवाय टिकत नाही आणि त्या संस्थेचा प्रमुख असतो, त्याला थोडंसं